सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक**

चेहेडी (बु),सामनगांव रोड, नाशिक रोड,नाशिक - ४२२ १०१

दुरध्वनी क्रमांक . (०२५३) २४६१४७९

ई मेल ronashik@dtemaharashtra.gov.in　　　　संकेतस्थळ - www.dtensk.org

जा.क्र. - विकाप/महाडीबीटी/ तांशा/२०२०-२१/100　　　　दिनांक-: 14 JAN 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
नाशिक विभाग, नाशिक

**विषय -शैक्षणिक वर्ष २०२०-२१ महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनायांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत...**

**संदर्भ** - संचालनालयाचे पत्र क्र १८/तंशिसं/ डीबीटी /२०१०-२१ /विकाप/२०२१/१३ दिनांक १३/०१/२०२१

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत एकुण ०३ योजना राबविण्यात येत आहे.

**योजनांची नावे -**

१. राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाअंतर्गत येणा-या सर्व संस्थांना सुचित करण्यात येते, की एक ते दिड महिना उलटुनसुद्धा संचालनालया अंतर्गत राबविल्या जाणा-या योजनांसाठी खुप कमी प्रमाणात अर्ज विद्यार्थ्यांकडून भरण्यात आलेले आहेत. प्राप्त अर्जांची संख्या खुप कमी असल्याने सुचित करण्यात येते की, संस्थांनी सर्व पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्यात यावे व संस्थेने त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये प्राप्त होणारे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची तपासणी करुन मंजुर / नामंजुर करुन पुढील कार्यवाही करावी.

तसेच आपणास सुचित करण्यात येते की, कोणतही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासुन वंचित राहीला तर या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी. यासंदर्भात वेळोवेळी महा-डिबीटी पोर्टल वरील सुचनांचे पालन करावे व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

(ज्ञानदेव पुंडलिकराव नाठे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रतिलिपी - मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर

Scanned with CamScanner